# लिंगभाव समानता

SHIVAJI COLLEGE
HINGOLI




Assistant Professor
Shivaji College, Hingoli,
Tq.& Dist. Hingoli (M.S.)

संपादक
डॉ. संदीप बी. काळे

# Index


| S.No | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | मुलांच्या शैक्षणिक विकासात महिला पालकाची भूमिका<br>डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे | 1 |
| 2 | लैंगिक असमानतेची कारणे आणि जागरूकता<br>प्रा. प्रियंका भाऊसाहेब पेंडभाजे | 7 |
| 3 | महिला सबलीकरण डॉ. स्वाती मधुकर वाकोडे | 15 |
| 4 | आदिवासी समुदायातील लिंगभाव समानता<br>प्रा. डॉ. सुनिल प्रल्हाद गायगोळ | 22 |
| 5 | नव्वदोत्तरी स्त्रीवादी कथाविश्वाचा अभ्यास<br>प्रा. डॉ. प्रिती किशोर उमाठे | 30 |
| 6 | लिंगभाव समानता : मानवी हक्क आणि घटनात्मक तरतुदी<br>डॉ.सुखनंदन ढाले | 36 |
| 7 | लैंगिक असमानता आणि त्यावरील उपाय<br>प्रा. डॉ. हुरगूळे निवृत्ती रंगनाथ | 44 |
| 8 | महिलांचा क्रीडा क्षेत्रातील सहभाग वाढविणे - एक आव्हान<br>प्रा. डॉ. गुणाजी पांडुरंग नलगे | 53 |
| 9 | पंचायतराज व्यवस्थेत स्त्रियांचा सहभाग<br>प्रा. हेमलता आनंदराव उराडे | 58 |
| 10 | स्त्री सक्षमिकरण आणि मानवाधिकार : योजना आणि उपाय<br>डॉ. हर्षना सोनकुसरे | 66 |
| 11 | लिंगभेदभाव आणि तृतीय पंथीयांच्या समस्या डॉ. लता नारायण जाधव | 72 |
| 12 | LGBTQ समुदाय व सामाजिक चळवळीचीवाटचाल<br>विशाल डोळे | 78 |




SHIVAJI COLLEGE • HINGOLI •
Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

# महिलांचा क्रीडा क्षेत्रातील सहभाग वाढविणे - एक आव्हान

**प्रा. डॉ. गुणाजी पांडुरंग नलगे**
संचालक, शारीरिक शिक्षण आणि क्रीडा शिवाजी महाविद्यालय ,हिंगोली 431513
nalgegp21@gmail.com,9420038008

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

## प्रस्तावना

पूर्वीपासून आपल्याकडे आणि परदेशात खेळ खेळले जातात. खेळ म्हणजे मनावरील तनाव दूर करण्यासाठी कामातून वेळ काढून केलेली कृती होय. प्रत्येक जीव जेव्हा जन्माला येतो तेव्हा त्याला जगण्यासाठी धडपड करावी लागते. मुले/ मुली लहानपणी धावत असतात, उड्या मारतात, एकमेकांना भेटतात, सोबत खेळतात त्यातून त्यांचे मनोरंजन होते, ऊर्जा मिळते, प्रेरणा मिळते, शक्ती मिळते. पुढे जसजसे वय वाढत जाते तसतसे जगण्यासाठी स्वअस्तित्व निर्माण करण्यासाठी ते धडपडत असतात. त्यासाठी त्यांना कोणतेतरी काम शोधावे लागते, नोकरी शोधावी लागते, उद्योग करावा लागतो त्यामुळे शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक श्रम होतात. त्यातून थकवा जाणवतो तो थकवा दूर करण्यासाठी खेळ खेळणे गरजेचे असते त्यातून त्याचे मनोरंजन होते. कामाने शरीर तंदुरुस्त होते तर खेळाने शारीरिक व मानसिक सुदृढता निर्माण होते. अशी म्हण आहे 'सुदृढ शरीरात सुदृढ मन राहते.' लहानपणी खेळतांना मुले, मुली असा भेद नसे सारे जण एकत्र खेळत असत, राहत असत, शिकत असत. पण जेव्हा त्यांचे वय वाढत जाते ते तरुण वयात येतात तेव्हा समाज व्यवस्थेमुळे समाज बंधनामुळे मुल/ मुली असा भेद व्हायला सुरुवात होते. तो भेद सुरू होतो खाण्यापिण्यापासून, राहण्यापासून, कपड्यापासून ते शिक्षणापर्यंत, खेळण्यापर्यंत अशा अनेक गोष्टीत मुलापेक्षा मुलीला जास्त बंधने घातले जातात. अलीकडील काळात म्हणजे मध्ययुगीन काळात स्त्रियांना कमी लेखल्या जाऊ लागले, सामाजिक बंधने कडक करण्यात आली, स्त्रियांना गुलामाप्रमाणे वागणूक मिळू लागली, प्रत्येक कार्यात स्त्रियांवर मर्यादा आल्या पण मध्ययुगीन काळाच्या अगोदरचा काळ स्त्रियांसाठी चांगला होता, कारण त्या काळात

Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

त्यांना देवी, माता, लक्ष्मी, पार्वती, सरस्वती, दुर्गा अशा देवदेवतांच्या नावाने संबोधून त्यांना देवार्यात बसवण्यात आले होते. हा काळ स्त्रियांसाठी सुवर्णकाळ होता. त्याच काळात प्रदेशात ज्या काळाला आपण प्राचीन ऑलम्पिक म्हणतो त्या काळात ग्रीस, रोम देशात झीजस देवीच्या नावाने हयाऑलिंपिक स्पर्धा घेतल्या जात असत. पण स्पर्धेत महिलांना सहभागी होता येत नसे. स्त्रियांना खेळात प्रवेश मिळण्यासाठी एक घटना घडली ती म्हणजे फेरेनाईस नावाच्या मुलीचे वडील आणि भाऊ यांनी ऑलम्पिक मेडल जिंकले. ती प्रेरणा घेऊन त्या मुलीने तिच्या लग्नानंतर आपल्या मुलाला प्रशिक्षण द्यायला सुरू केले. त्यामुळे त्या मुलाने ऑलम्पिक मध्ये मेडल मिळविले. हा प्रसंग बघण्यासाठी त्या ऑलिंपिकच्या मैदानावर त्या खेळाडूची आई म्हणजे प्रशिक्षक तिनी पुरुषवेश धारण करून स्पर्धा बघितली. कारण स्त्रियांना स्पर्धा बघायला पण बंदी होती. पदक जिंकल्यामुळे आनंदाच्या भरात ती तशीच पुरुष वेशातच मैदानात धावत गेली तिला पकडल्यानंतर लोकांना कळाले की ती एक महिला आहे. तिने गुन्हा तर केला होताच आणि कायद्याप्रमाणे शिक्षाही व्हायला पाहिजे होती पण तिचे प्रशिक्षकाचे महान कार्य बघून तिला त्या ठिकाणच्या जज मंडळींनी माफ केले. तेव्हापासून महिलांना ऑलम्पिक स्पर्धा बघणे आणि त्यात भाग घेणे सुरू झाले ते आजपर्यंत चालू आहे. पण पुरुषांच्या मानाने स्त्रियांची प्रगती जशी व्हायला पाहिजे होती तशी झालेली दिसत नाही. आज पण पुरुषांच्या मानाने स्त्रियांचे खेळातील प्रमाण फार कमी आहे. त्याला सामाजिक कारणे जबाबदार आहेत. ती खालील प्रमाणे. पुरुषप्रधान संस्कृती, स्त्रियांचे शिक्षणातील अल्प प्रमाण, सामाजिक रूढी परंपरा, अंधश्रद्धा आणि स्त्रीला अबला समजणे. ऑलम्पिक स्पर्धांचा विचार केला तर असे लक्षात येते की इसवी सन 1900 मध्ये फक्त 22 महिलांनी स्पर्धेत सहभाग घेतला तर पुरुष 1000 होते. तेव्हापासून आतापर्यंत म्हणजे 2022 पर्यंत पुरुषांच्या मानाने स्त्रियांचे ऑलिम्पिक मधील प्रमाण असो किंवा बाकी कोणत्याही स्पर्धेतील प्रमाण असो खेळाचे प्रमाण हे अर्धेच आहे. म्हणजे निम्म्यावरच मुली आजही खेळत आहेत. ऑलम्पिक सारख्या इतर जागतिक स्तरावरील स्पर्धेत स्त्रियांचा सहभाग बरोबर दाखवण्याचा प्रयत्न केला जात आहे. पण प्रत्यक्ष मराव

SHIVAJI COLLEGE
Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)



400

करताना, प्रशिक्षण घेताना पुरुषांच्या मानाने महिलांचे अल्प प्रमाण आहे हे मान्य करावे लागेल.

1) **पुरुषप्रधान संस्कृती:-**

यामध्ये पुरुषाकडे सामाजिक, आर्थिक, बौद्धिक, न्यायिक अधिकाराचा कल असतो कारण यात पुरुष सर्वाधिकार आपल्याकडे घेतो. या अधिकाराचा गैरवापर करून स्त्रीजातीवर, आपल्या पत्नीवर अत्याचार करतो तिला गुलाम बनून अन्याय करतो, बंधने लादतो, मानवी अधिकाराचा गैरवापर करतो, पती म्हणून स्वतःला हुकूमशा समजतो. पुरुष जेंव्हा लग्न करतो तेव्हा आपल्या जोडीदारावर, पत्नीवर अधिकार गाजवतो. जेव्हा पुरुष वडील म्हणून पात्र निभावतो तेव्हा त्याला वाटते मुलींनी माझे सारे ऐकावे, माझ्या अधिकारात राहावे मी म्हणेल तसेच वागावे. जेव्हा भावाचे नाते निभावतो तेव्हा वाटते बहिणीने माझे सारे ऐकावे, मी म्हणतो तसेच वागावे मग तो भाऊ लहान असला तरी मोठ्या बहिणीवर अधिकार गाजवतो. याचे उदाहरण म्हणजे सैराट सारख्या चित्रपटाच्या कथेतून अनुभवायला मिळते. जेव्हा पुरुष प्रियकर म्हणून आपली भूमिका निभातो तेव्हा तो स्वतःला श्रेष्ठ समजतो आणि तिने त्याच्या मनाजोगे नाही वागले तर तीच्यावर ॲसिड हल्ला करतो, पेट्रोल टाकून जाळण्याचा प्रयत्न करतो, अन्याय अत्याचार करतो. महिलां जेव्हा जेव्हा पुरुषाच्या बरोबरीने वागण्याचा प्रयत्न करते, तेव्हा तेव्हा पुरुषाचा मी पणा जागृत होतो. आणि महिलावर अधिकार गाजवून त्यांना खाली दाखवण्याचा प्रयत्न करतो.

2) **सामाजिक रूढी परंपरा :-**

स्त्रीला कमी लेखण्यासाठी सामाजिक रूढी परंपरा खूप कारणीभूत आहेत. आतापर्यंतच्या इतिहासात पाहिले तर काही काळ सोडला तर आतापर्यंत महिलावर अन्याय आणि अत्याचार होत आला आहे आणि होत आहे. महिला वरील वाढते अत्याचार पाहून अनेक चळवळीतून, कायद्यात बदल करून अत्याचार कमी कसा होतील याकडे साऱ्या जगाचे लक्ष लागले आहे. १९७५ हे साल संबंध जगभरच एका नव्या क्रांतीचे वातावरण तयार करून गेले. स्त्रियांचे प्रश्न हे विश्वव्यापी आहेत हे लक्षात आल्यावर संयुक्त राष्ट्र संघाने 1975 हे वर्ष महिला वर्ष आणि 8 मार्च हा



SHIVAJI COLLEGE • HINGOLI •
Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)
401

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

महिला दिवस म्हणून घोषित केला. स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्यानंतर अनेक वेळा संघर्ष झाला, आंदोलने झाली पण त्यामुळे महिला वरील अत्याचार कमी होण्याचे नाव घेत नाही.महिलांवरील अन्याय शिगेला पोहोचलेला असताना भारतात 1960 ते 70 च्या काळात अनेक आंदोलने, चळवळी सुरू झाल्या. संघटना आपले कार्य दाखवू लागल्या यात विद्यार्थी, मजूर, गिरणी कामगार, शेतमजूर, दलित, आदिवासी असे अनेक समाजातील घटक पेटून उठले त्यांनी क्रांती करायला सुरुवात केली. यामध्ये महिलांचा सहभाग फार मोठ्या प्रमाणावर होता आणि अनेक संघटनात महिलांचा सक्रिय सहभाग होता. पण त्या संघटनांमध्ये सुद्धा लिंगभेद केला जात होता. बाहेर भाषणात स्त्री पुरुष समानतेवर भाषण देणारे घरात मात्र पुरुषप्रधान संस्कृती दाखवायचे स्त्रियांना लढताना अनेक समस्यावर अनेक स्तरावर लढावे लागत होते.1975 हे साल भारता सोबतच जगात, अनेक देशात नव्या क्रांतीचे वातावरण तयार करण्यात महत्त्वाचे ठरले. याची दखल संयुक्त राष्ट्र संघाला घ्यावी लागली आणि त्यांनी 8 मार्च हा महिला दिवस म्हणून घोषित केला. याने महिलांच्या समस्या काही सुटल्या नाहीत. 50 वर्षे होत आहेत तरी अजून प्रश्न, समस्या फार कमी झाल्या नाहीत. जातीव्यवस्था जोपर्यंत संपत नाहीत तोपर्यंत महिला वरील अत्याचार कमी होणार नाहीत असे दिसून येते.

2) **स्त्रीला अबला समजणे :-**

यामुळे पुरुषांनी नेहमी कोणत्या ना कोणत्या कारणाने स्त्रीला दुबळे करून लैंगिक अत्याचार फार मोठ्या प्रमाणावर केले आहेत. महिलांना अशिक्षित ठेवणे, आर्थिक व्यवहारापासून दूर ठेवणे, कौटुंबिक जबाबदारी त्यांच्यावर लादणे ,रूढी परंपरा, सामाजिक बंधने टाकून आजही महिलावर अत्याचार होत आहेत. महिला वरील अन्याय, अत्याचाराचे प्रमाण कमी करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने 'महाराष्ट्र शक्ती क्रिमिनल लॉ' असे विधेयक 2020 साली विधिमंडळात मंजूर करण्यात आले. आंध्र प्रदेशातील 'दिशा' कायद्याप्रमाणे हा 'शक्ती कायदा' 14 मार्च 2022 रोजी राष्ट्रपतीची सही होऊन अमलात आला आहे. कायदा अमलात आला तरी महिला वरील अत्याचार कमी होण्याचे नाव घेत नाही. जानेवारी 2023 मध्ये एका

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)



402

खासदाराकडून महिला कुस्तीपटूवर लैंगिक अत्याचार झाल्याचा आरोप करण्यात आला.त्यासाठी फार मोठे आंदोलन जंतर-मंतरवर करण्यात आले. यामध्ये अनेक संघटनेच्या महिला पदाधिकारी, महिला खेळाडू त्यासोबत पुरुष खेळाडूही आंदोलनात फार मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले होते. असे अनेक संघटनाच्या पदाधिकाऱ्याकडून महिला खेळाडू वर पदाधिकाऱ्यावर अन्याय अत्याचार होतात आणि होत आहेत. हे रोकायचे असेल तर कडक कायदे करणे गरजेचे आहे. त्याची अंमलबजावणी कडक करण्याची गरज आहे. सामाजिक परिवर्तन होणे गरजेचे आहे. महिलांना जोपर्यंत समान अधिकार दिला जाणार नाही तोपर्यंत महिलांचे क्रीडा क्षेत्रातील सहभागांचे प्रमाण वाढविणे शक्य होणार नाही. लोकांकडून महिलांना पूर्ण स्वातंत्र्य आतापर्यंत दिले नाही. त्यामुळे महिलांचा खेळातील सहभाग वाढणे समाजासमोर मोठे आव्हान आहे.

**संदर्भ ग्रंथ:-**

1)डॉ.राजेश्वर देशमुख, (2016)., ऑलम्पिक मधील भारतीय महिला खेळाडूंचा दर्जा व कामगिरी – एक अध्ययन.

2)http://oldpesrj.lbp.world>u

3)श्री हुलेश्वर जोशी,(2018). पुरुषप्रधान समाज की मानसिकता.

4)thebharat.co.in https://www.thebharat.co.in

5)loksatta.com https://www-loksatta>chaturang

6) www.bbc.com https://www.bbc.com/marathi/ india-55276028.amp

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)